



दैनिक **अक्षराज** अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com



खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला
फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स
एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here



वर्ष : ०५ | अंक : २२१, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, मंगळवार, दि.२४ मार्च २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056


# प्रेग्नंट बायकोवर खरातने केले अत्याचार, हादरवणारा कांड समोर

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२३, नाशिक :** नाशिकमध्ये स्वयंघोषित ज्योतिषी, 'कॅप्टन' आणि भोंदूबाबा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अशोक खरात यांच्यावर लैंगिक छळ, बलात्कार आणि महिलांचे शोषण यासंबंधीचे आतापर्यंत तीन गुन्हे दाखल झाले आहेत. या प्रकरणाने संपूर्ण महाराष्ट्र हादरला असून, खरातच्या कथित 'दैवी शक्ती'च्या नावाखाली चालणाऱ्या अंधश्रद्धा आणि शोषणाच्या साम्राज्याचा पोल खोल झाली आहे. एका गर्भवती महिलेच्या पतीला जेव्हा कळाले की त्याच्या पत्नीसोबत खरातने नको ते केले. त्यानंतर त्याने मोठे पाऊल उचलले.



**प्रकरणाची सुरुवात कशी झाली?**

१७ मार्च रोजी अशोक खरात विरोधात पहिला गुन्हा दाखल झाला. एका विवाहित महिलेने अशोक खरात यांच्यावर लैंगिक छळाचा आरोप केला. गुन्हा दाखल होताच पोलिसांनी रात्री उशिरा गुप्तपणे त्याच्या निवासस्थानी छापा टाकला आणि अटक केली. अनेक राजकीय नेत्यांशी हितसंबंध असलेल्या खरातला अटक करताना पोलिसांनी कमालीची गोपनीयता पाळली होती. रविवारी आणखी दोन महिलांनी खरातविरोधात तक्रार दाखल केली. यातील एका घटस्फोटित म हिलेची तक्रार तर दुसरी २०२३ मधील एका सात महिन्यांच्या गरोदर महिलेची आहे. या तक्रारींनंतर खरातच्या अघोरी साम्राज्याचा पर्दाफाश कसा झाला, हे आता स्पष्ट होत आहे.

**पर्दाफाश कुणी केला?**
**नेमके काय घडले?**

पोलिस सूत्रांच्या माहितीनुसार, खरातचा मुख्य पर्दाफाश त्याच्या एकेकाळच्या अगदी जवळच्या आणि निस्सीम भक्त असलेल्या व्यक्तीने केला. ही व्यक्ती खरातच्या वाईट कृत्यांना साथ देत होती आणि त्यामुळे तो बराच काळ सुरक्षित राहिला होता. पण एका घटनेने सगळे उलटे झाले. २०२३ मध्ये ही व्यक्ती आपल्या सात महिन्यांच्या गरोदर पत्नीला घेऊन खरातकडे आली. प्रसूती सुरक्षित व्हावी, बाळाला चांगली संतती मिळावी यासाठी पूजा-विधी करायचे असल्याचे सांगून खरातने या व्यक्तीला केबिनच्या बाहेर बसवले. प्रभावाखाली असलेल्या व्यक्तीने बाहेर जाणे पसंत केले.

पण केबिनमध्ये लाइट बंद करून खरातने त्या गरोदर महिलेवर हात टाकला, अश्लील कृत्ये केली आणि तिचे लैंगिक शोषण केले. बाहेर आल्यानंतर महिलेच्या पतीला हा प्रकार सांगितला गेला. सुरुवातीला विश्वास बसला नाही, पण तिने आपल्या होणाऱ्या बाळाची शपथ घेतल्यावर सत्य समजले.

**इथून सुरू झाला खरातच्या साम्राज्याचा अंत...**

या घटनेनंतर संबंधित व्यक्तीने खरातच्या हालचालींवर बारकाईने लक्ष ठेवले. संशय बळावल्यानंतर त्याने खरातच्या ऑफिस/केबिनमध्ये छुपे कॅमेरे बसवले. या कॅमेऱ्यांद्वारे केबिनम धील अनेक लैंगिक छळाचे व्हिडीओ त्याने रेकॉर्ड केले. हे सर्व पुरावे एका पेनड्राइव्हमध्ये घेऊन त्याने नाशिक पोलिसांकडे सादर केले. व्हिडीओ पाहून पोलिसांनाही धक्का बसला. या पुराव्यांम ुळे खरातच्या साम्राज्याला सुरुंग लागला आणि एकापाठोपाठ गुन्हे दाखल होऊ लागले.

# केंद्र सरकारने आपला शब्द पाळावा; जातगणनेत ओबीसींचा कॉलम ठेवावा

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२३, चंद्रपूर :** केंद्र सरकारने आपला शब्द पाळावा; जातगणनेत ओबीसींचा कॉलम ठेवावा, असा सुर देशव्यापी ओबीसी आंदोलनातून निघाला. जातनिहाय जनगणनेसाठी राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे दिल्लीमध्ये आज (दि.२३) ला देशव्यापी आंदोलन संपन्न झाले.




केंद्र सरकारने ३० एप्रिल २०२५ मध्ये जातनिहाय जनगणना करण्याचा कॅबिनेट निर्णय घेतला होता. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी घोषणा केली होती की, आगामी राष्ट्रीय जनगणनेत (२०२७) ओबीसी आणि इतर जातींची गणना पारदर्शकपणे केली जाईल, मात्र प्रत्यक्षात आता जनगणना अर्जात ओबीसींचा कॉलम नाही. ओबीसी सोबत ही धोखाधडी आहे, त्यामुळे या निर्णयाचे पालन केंद्र सरकारने करायला पाहिजे व जनगणनेत ओबीसींचा कॉलम समावेश करायला पाहिजेच, असे मत ओबीसी आंदोलनातून पुढे आले.

अनुसूचित जाती, जमातीबरोबरच ओबीसींची जातनिहाय जनगणना करण्याचे केंद्र सरकारने ३० एप्रिल २०२५ रोजी जाहीर केले होते. यासंदर्भात जनगणना आयुक्तांनी २२ जानेवारीला राजपत्र जारी करीत जनगणनेसंबंधी ३३ प्रश्नांची सूची जाहीर केली आहे, त्यात बाराव्या क्रमांकावर अनुसूचित जाती आणि जमातीचा उल्लेख आहे. मात्र ओबीसींचा उल्लेख नाही. त्यामुळे ओबीसींची जातीनिहाय जनगणना होईल की नाही, असा संभ्रम ओबीसींच्या मनात निर्माण झालेला आहे. आणि यावर केंद्र सरकार कोणतेही स्पष्टीकरण द्यायला तयार नाही. त्यामुळे राष्ट्रीय ओबीसी महासंघ, बीसी वेल्फेअर असोसिएशन तेलंगाना / आंध्रप्रदेश आणि ओबीसी महासभा अन्य संघटनांच्या वतीने नवी दिल्ली येथील जंतर मंतर मैदानावर आज दि. २३ मार्चला दुपारी २ ते ५ या कालावधीत ओबीसींच्या जातीनिहाय जनगणनेसह, यूजीसी बिल २०२६ लागू करावे, केंद्रात स्वतंत्र ओबीसी मंत्रालय स्थापन करावे, क्रिमिलेअयर ची मर्यादा १३ सप्टेंबर २०१७ वाढली नाही, ती वाढवून २० लाख करण्यात यावी आणि केंद्रात ओबीसींचे स्वतंत्र मंत्रालय स्थापन करण्यात यावे, आरक्षणाची ५०% मर्यादा हटविण्यात यावी, केंद्र सरकारने २४३ डी, २४३ टी सेक्शन ६ मध्ये दूरस्थी करून स्थानिक स्वराज संस्थेत ओबीसींना २७% आरक्षण देण्यात यावे, या प्रमुख म ागण्यासह इतर मागण्या घेऊन देशव्यापी आंदोलन केले.

ऑक्टोबर २०२६ पासून जम्मू-काश्मीर, हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंडमध्ये आणि त्यानंतर उर्वरित भागात मार्च २०२७ पासून जनगणना सुरू करणार असल्याचे स्पष्ट केले होते. त्यानंतर जनगणना आयुक्तांनी एक अधिसूचना काढत राजपत्र जारी केले. २२ जानेवारीला जनगणना करण्यासाठी ३३ प्रश्नांची सूची तयार करून राजपत्रात समाविष्ट केल्या. १२ व्या क्रम ांकावर अनुसूचित जाती आणि जमातीचा उल्लेख आहे तर इतरांसाठी अन्य शब्दाचा प्रयोग केला असून ओबीसींचा स्पष्ट उल्लेख नाही. मागास ठरविण्याच्या निकषात त्या जातीतील प्रत्येक कुटुंबाची आर्थिक व सामाजिक स्थिती महत्त्वाचा घटक ठरत असते, पहिल्या टप्प्यात प्रत्येक कुटुंबाची माहिती संकलित केली जाणार असून त्यात केवळ अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व धर्म याचीच नोंद केली जाणार आहे. ओबीसी हा सुद्धा मागास प्रवर्ग असताना त्याची नोंद का नाही ? असा ओबीसींचा केंद्र शासनाला सवाल आहे. या संदर्भात केंद्र शासनाला जागे करण्यासाठी राष्ट्रीय ओबीसी महासंघ, बीसी वेल्फेअर असोसिएशन (तेलंगाना/आंध्रप्रदेश), ओबीसी महासभा आणि देशातील सर्व ओबीसी संघटनेतर्फे देशव्यापी आंदोलन केले. या आंदोलनात देशभरातून मोठ्या संख्येने ओबीसी समाज बांधव सहभागी झाले होते.यावेळी महाराष्ट्रातील खासदार प्रतिभा धानोरकर, खासदार डॉ. नामदेव किरसान, खासदार डॉ. प्रशांत पडोले, आंध्रप्रदेशातील खासदार अप्पला नायडू, खासदार अंबिका लक्ष्मी नारायण, बुस्टीपती नागराजु, तेलंगणातील खासदार भट्टी मल्लू रवि, श्याम कुमार बर्वे, कल्याण काळे, डॉ. शिवाजी काळे, बळवंत वानखेडे, बाळू मामा म्हात्रे, इकबाल अन्सारी आदींनी आंदोलनाला भेट दिली.

आंदोलन यशस्वी करण्याकरिता राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे अध्यक्ष डॉ. बबनराव तायवाडे, म हासचिव सचिन राजुरकर, राष्ट्रीय समन्वयक डॉ. अशोक जीवतोडे, इंद्रजीत सिंह , कमलेश गुप्ता, कार्याध्यक्ष प्रा. शेषराव येलेकर, शरद वानखेडे, सुभाष घाटे, डॉ. प्रकाश भागरथ, दिनेश चोखारे, रत्नमाला पिसे, महिला अध्यक्ष ज्योतीताई ढोकणे, बीसी वेल्फेअर असोसिएशन तेलंगनाचे अध्यक्ष श्रीनिवास जाजुला, आंध्रप्रदेश अध्यक्ष शंकरअण्णा, ओबीसी महासभाचे, वधर्मेंद्र कुशवाह, प्रकाश भागरथ, गुणेश्वर आरिकर एकनाथ तारमाळे, प्रकाश साबळे, शिव प्रसाद शाहू, सूरज बेलोकर, ऋतिका डफ, श्रीकांत मसमारे, शकील पटेल, मुकेश पुंडके, रवी टोंगे, रणजीत डवरे, विक्रम गौड, शाम अण्णा, विजय डवंगे, श्यामकांत थेरे, गणेश आवारी, भावनाताई बावनकर, आदींनी परिश्रम घेतले.

# पुन्हा कोसळणार पाऊस! मराठवाड्यासह मध्य महाराष्ट्रावर संकट

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२३, मुंबई :** राज्यात गेल्या काही दिवसांपासून हवामानात सतत बदल होताना दिसत आहे. मार्च महिना संपत आलेला असतानाही पाऊस काही जाण्याचे नाव घेत नाही. सतत अवकाळी पाऊस हजेरी लावताना दिसत आहे. त्यामध्येच आता पुन्हा एकदा भारतीय हवामान विभागाकडून पावसाचा मोठा इशारा देण्यात आला. राज्यात अवकाळी पावसाचे सावट कायम आहे. मराठवाडा, दक्षिण मध्य महाराष्ट्र या भागात आजही अवकाळी पाऊस हजेरी लावण्याची शक्यता आहे. यासोबतच राज्यातील इतर भागात उन्हाचा चटका अधिक तीव्र होणार आहे. भारतीय हवामान विभागाने कोकणात आज उष्ण आणि दमट हवामानाचा इशारा दिला. आज सांगली, सातारा, धाराशिव, लातूर, सोलापूर या भागात पावसाचा इशारा देण्यात आला. मागील काही दिवसांपासून लातूर जिल्ह्यात सतत अवकाळी पाऊस हजेरी लावताना दिसत आहे. अवकाळी पावसामुळे शेती पिकांचे मोठे नुकसान झाले. त्यामध्येच आता पुन्हा एकदा पावसाचा इशारा हवामान विभागाने दिला आहे.


कोकणात आज उष्ण आणि दमट हवाम ानाचा इशारा असला तरीही राज्यातील इतर भागात ढगाळ वातावरणासह पाऊस येण्याची शक्यता आहे. आज राज्यातील हवामान सतत चढउतार बघायला मिळेल. राज्यासह देशातील अनेक भागात पाऊस हजेरी लावताना दिसत आहे. राज्यातील मागील चार ते पाच दिवसांपासून सतत काही भागात अवकाळी पाऊस हजेरी लावत आहे. या अवकाळी पावसांमुळे शेती पिकांचे मोठे नुकसान होत आहे. जळगावच्या धरणगाव तालुक्यातील वराड येथे वादळी वाऱ्यामुळे चार एकरावरील ज्वारी जमीनदोस्त झाली. अचानक आलेल्या वादळी वाऱ्यामुळे शेतकऱ्याची चार एकरवरील ज्वारी पूर्णपणे आडवी पडली असून लाखांचे नुकसान झाले आहे. तब्बल १०० क्विंटल ज्वारीचे उत्पन्न आले असते. मात्र वादळी वाऱ्याने नुकसान झाल्याची माहिती शेतकऱ्याने दिली आहे.

हातात तोंडाशी आलेला घास निसर्गाने हिरावून घेतल्याने शेतकरी शेतकरी हतबल झाला असून नुकसान भरपाईची मागणी शेतकऱ्यांनी केली आहे . गेल्या दोन ते तीन दिवसांपासून हवामानात मोठा बदल झाला असून अनेक ठिकाणी वादळी वाऱ्यासह अवकाळी पाऊस झाला आहे. निफाड तालुक्यात १८ मार्च रोजी झालेल्या अवकाळी पाऊस आणि गारपीटने सहा गावातील ३९६ शेतकऱ्यांचे १६५ हेक्टरवरील कांदा, गहू द्राक्ष शेतीचे नुकसान झाले तर दुसऱ्या दिवशी १९ मार्च रोजी १६ गावातील १३६४ शेतकऱ्यांचे ६२२ हेक्टर क्षेत्रावरील द्राक्ष, कांदा, गहू, मिर्ची नुकसान झाले.

# बदलापूरवरून नवी मुंबई आता फक्त ३० मिनिटात

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.२३, ठाणे :** बदलापूरवरुन आता थेट नवी मुंबईला जाता येणार आहे. यासाठी नवीन रेल्वे मार्ग तयार केला जाणार आहे. यामुळे प्रवाशांचा खूप वेळ वाचणार आहे.




मध्य रेल्वेच्या प्रवाशांसाठी ही आनंदाची बातमी आहे. कारणआता बदलापुर- अंबरनाथकरांचा प्रवास अधिक वेगवान होणार आहे. यासाठी नवीन रेल्वेमार्ग तयार केला जात आहे. कासगाव-कामोठे या नवीन रेल्वे मार्गाला हिरवा कंदील मिळाला असून या रेल्वे मार्गाच्या लोकेशन सर्व्हेला रेल्वे मंत्रालयाने मंजुरी दिली आहे.बदलापूरचे माजी नगराध्यक्ष राम पातकर यांनी नुकतीच नवी दिल्लीत केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची भेट घेतली. या भेटीत नव्या रेल्वे मार्गाच्या सर्व्हेक्षणाला मंजुरी देण्यात आली आहे.

रेल्वेच्या या नवीन मार्गामुळे मुंबईकरांचा प्रवास खूप सोपा होणार आहे. बदलापूरवरुन थेट नवी मुंबईला जाता येणार आहे. बदलापूर ते नवी मुंबई हा प्रवास ३० मिनिटांत होणार आहे. याचसोबत आजूबाजूच्या परिसरात कनेटिव्हिटी वाढेल. त्यामुळे खूप फायदा होणार आहे. बदलापुर वांगणी आणि आजूबाजूच्या इतर ठिकाणांना फायदा होणार आहे.

बदलापूर आणि अंबरनाथमध्ये जवळपास १० लाख लोक राहतात. शहरातील अनेक लोक कामासाठी नवी मुंबईला जातात. शहरातील लोकांना नवी मुंबईला जाण्यासाठी ठाण्यावरुन ट्रेन बदलून जावे लागते. यामुळे दीड तास लागतात. मात्र, बदलापूरवरुन थेट नवी मुंबईला जोडल्या जाणाऱ्या या ट्रेनमुळे प्रवास सोपा आणि जलद होणार आहे.

वांगणी आणि बदलापूरच्या मध्ये कासगाव हे स्थानक उभारण्यात येणार आहे. त्यानंतर कासगाव ते कामोठे हा नवीन रेल्वे मार्ग तयार केला जाणार आहे. यामुळे नवी मुंबईला फक्त अर्ध्या तासात जाता येणार आहे. हा रेल्वे मार्ग झाल्यास बदलापूर, अंबरनाथ, वांगणी, उल्हासनगर येथील प्रवाशांना खूप फायदा होणार आहे. अवघ्या काही मिनिटात ते नवी मुंबईला पोहचू शकणार आहेत.

# पुन्हा युद्ध पेटणार? इराणने ऐकलं नाही तर डोनाल्ड ट्रम्प यांच्या मनात नेमकं काय?



इराण आणि अमेरिका यांच्यातील संघर्ष थांबला आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी ५ दिवसांसाठी हल्ले थांबवण्याचा निर्णय घेतला आहे. त्यांच्या या निर्णयाचे जागतिक स्तरावर स्वागत होत आहे. मात्र ट्रंप यांनी स्पष्ट केले आहे की जर इराणने चर्चेद्वारे सहमती दर्शवली नाही, तर त्यांच्यावर बॉम्बहल्ले पुन्हा सुरू केले जातील. यामुळे युद्ध पुन्हा भडकण्याची शक्यता आहे. असे झाल्यास संपूर्ण जगाचं पुन्हा एकदा टेन्शन वाढणार आहे. डोनाल्ड ट्रम्प नेमकं काय म्हणाले ते जाणून घेऊयात.

दोन्ही देशांमध्ये चर्चा सुरू – ट्रम्प

डोनाल्ड ट्रम्प यांनी सोमवारी सांगितले की, अमेरिका आणि इराण यांच्यात सतत संपर्क सुरू असून दोन्ही देश युद्ध समाप्त करण्याच्या अटींवर सहमतीकडे वाटचाल करत आहेत.' मात्र इराणच्या परराष्ट्र मंत्रालयाने हे दावे फेटाळून लावले असून कोणतीही चर्चा सुरू नसल्याचे म्हटले आहे. तसेच त्यांनी आरोप केला की ट्रंप केवळ ऊर्जा बाजार (तेलाच्या किमती) कमी करण्याचा प्रयत्न करत आहेत. लवकरच तोडला निघणार

काही दिवसांपूर्वी इराणला ४८ तासांचा अल्टिमेटम देऊन तणाव वाढवणारे ट्रंप यांनी सोमवारी ५ दिवस हल्ले थांबवण्याची आणि इराणसोबत सकारात्मक चर्चा सुरू असल्याची माहिती दिली. फ्लोरिडाहून मेम्फिसला रवाना होताना त्यांनी सांगितले की मध्यपूर्वेसाठी त्यांचे विशेष दूत स्टीव विटकॉफ आणि त्यांचे जावई जेरड कुशनर इराणी प्रतिनिधींशी चर्चा करत आहेत आणि ही चर्चा सकारात्मक दिशेने पुढे जात आहे. ट्रंप म्हणाले, 'आपण तोडगा काढण्याच्या खूप जवळ आहोत. आमची चर्चा अतिशय मजबूत राहिली आहे. ती कुठपर्यंत पोहोचते ते पाहावे लागेल. अनेक महत्त्वाच्या मुद्द्यांवर आमची सहमती झाली आहे. जवळपास सर्वच मुद्द्यांवर सहमती झाली आहे.'

तर इराणमध्ये सत्ताबदलाचा विचार करू – ट्रम्प

इराणकडून कोणाशी चर्चा होत आहे, असा प्रश्न विचारल्यावर ट्रंप यांनी सांगितले की, आमचे दूत इराणमधील अशा व्यक्तीशी बोलत आहेत ज्यांना तिथे आदर आहे. मात्र त्यांनी मोजतबा खामेनेई यांच्याशी कोणतीही चर्चा होत नसल्याचे स्पष्ट केले. ट्रंप यांनी असेही संकेत दिले की, जर इराणने माघार घेतली नाही, तर अमेरिका सत्तांतराच्या दिशेने पावले उचलू शकते. ट्रम्प म्हणाले की, 'वेनेझुएलाप्रमाणे सत्ताबदल करून नवीन नेतृत्व स्थापन करण्याचा विचार केला जाऊ शकतो.'




## जरा याद करो कुर्बानी...



दीडशे ते दोनशे वर्ष इंग्रजांच्या पारतंत्र्यात असणाऱ्या भारत मातेला इंग्रजांच्या गुलामीतून मुक्त करण्यासाठी हजारो स्वातंत्र्य सैनिकांनी स्वतःच्या जीवाचे बलिदान दिले. अनेक जण फासावर चढले तर कित्येकांनी इंग्रजांच्या गोळ्या छातीवर झेलल्या. या वीर स्वातंत्र्य सैनिकांच्या बलिदानाने १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत माता इंग्रजांच्या गुलामीतूम मुक्त झाली. देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी अनेक स्वातंत्र्य सैनिकांनी छातीवर गोळ्या झेलल्या तर अनेक स्वातंत्र्य सैनिक हसत हसत फासावर चढले. भगत सिंग, राजगुरू आणि सुखदेव हे स्वातंत्र्य सैनिक देखील भारत मातेला इंग्रजांच्या गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी हसत हसत फासावर चढले आणि शहीद झाले. देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी आपल्या जीवाची बाजी लावणारे स्वातंत्र्य सैनिक शहीद भगतसिंग, राजगुरु व सुखदेव यांना २३ मार्च १९३१ रोजी इंग्रजांनी फाशी दिली होती. आज २३ मार्च हा दिवस शहीदांच्या नावे कोरला गेला गेला आहे. आजच्याच दिवशी म्हणजे २३ मार्च १९३१ रोजी शहीद भगतसिंग, राजगुरु आणि सुखदेव यांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी स्वतःच्या प्राणाचे बलिदान दिले. ९५ वर्षांपूर्वी आजच्याच दिवशी इंग्रजांनी भगतसिंग, राजगुरु आणि सुखदेव यांना फाशी दिली होती. देशासाठी प्राणाची आहुती देणाऱ्या शहिदांना आदरांजली वाहण्यासाठी आजचा दिवस संपूर्ण देशात शहीद दिवस म्हणून साजरा केला जातो. १९२८ मध्ये सायमन कमिशन नावाचे शिष्टमंडळ भारतात आले होते. या कमिशनला विरोध म्हणून लाला लजपतराय यांनी मोठा मोर्चा काढला होता. सायमन कमिशनला विरोध करणाऱ्या लाला लजपतराय यांच्यावर इंग्रजांनी लाठीहल्ला केला. या लाठी हल्ल्यात लाला लजपतराय गंभीर जखमी झाले त्यातच त्यांचा मृत्यू झाला. लाला लजपतराय यांच्या मृत्यूनंतर संपूर्ण देशात इंग्रजांविरुद्ध संतापाची लाट उसळली. लाला लजपतराय यांच्या मृत्युनंतर देशातील जहाल गटाचे स्वातंत्र्य सैनिक कमालीचे चिडले. चंद्रशेखर आझाद, भगतसिंग, राजगुरु, सुखदेव आणि अन्य जहाल क्रांतिकारकांनी लाला लजपतराय यांच्या मृत्यूचा बदला घेण्याची शपथ घेतली. लाला लजपतराय यांच्या मृत्यूच्या एक महिन्याच्या आतच या क्रांतिकारकांनी आपली शपथ पूर्ण केली आणि १७ डिसेंबर १९२८ रोजी ब्रिटिश अधिकारी सँडर्सला गोळ्या घालून ठार केले. काही काळ ते भूमिगत राहिले मात्र फितुरीमुळे ते पोलिसांच्या हाती लागले. ७ ऑक्टोबर १९३० रोजी इंग्लिश कोर्टाने भगतसिंग, राजगुरु आणि सुखदेव यांना फाशीची शिक्षा सुनावली. यानंतर भगतसिंग यांची शिक्षा कमी व्हावी यासाठी फेर याचिका दाखल करण्यात आली मात्र १० मार्च १९३१ रोजी ती याचिका कोर्टाने फेटाळली. २३ मार्च हा दिवस भगतसिंग, राजगुरु आणि सुखदेव यांच्या फाशीसाठी निश्चित करण्यात आला. २३ मार्च १९३१ रोजी सकाळी ७ वाजून ३३ मिनिटांनी भगतसिंग, राजगुरु आणि सुखदेव यांना फाशी देण्यात आली. फाशीच्या वेळी या तिघांनी मेरा रंग दे बसंती चोला ...... हे गाणे गायले. फासावर लटकतानाही भारत मातेच्या या सुपुत्रांच्या चेहऱ्यावर कसल्याही प्रकारचे दुःख किंवा पश्चाताप नव्हता उलट भारत मातेसाठी फासावर जात असल्याचा अभिमान होता. आजच्या दिवशी भारत मातेला इंग्रजांच्या गुलामीतूम मुक्त करण्यासाठी आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या क्रांतिकारकांच्या बलिदानाचे स्मरण करणे हे प्रत्येक भारतीयांचे कर्तव्य आहे. भारत मातेला इंग्रजांच्या गुलामीतून मुक्त करण्यासाठी प्राणांची आहुती देणाऱ्या असंख्य ज्ञात अज्ञात शहिदांना शहिद दिनी विनम्र अभिवादन!

– श्याम ठाणेदार

# वणवे रोखा निसर्गसंपदा वाचवा!

उन्हाळा जसा तापू लागतो तसे वन खात्याच्या जंगलांना आगी लागण्याच्या घटनात वाढ होते. आताही राज्यात कोठेणा कोठे वन खात्याच्या जंगलांना आगी लागून वणवे पेटल्याच्या बातम्या वर्तमान पत्रात वाचायला मिळतात. काही वेळा या आगी वेळीच आटोक्यात येतात पण बऱ्याचदा या आगी वेळीच आटोक्यात न आल्याने त्या रौद्र रूप धारण करतात आणि त्याचे रूपांतर मोठ्या वणव्यात होते आणि त्यात बहुमोल अशी निसर्ग संपदा जळून खाक होते. तीन वर्षापूर्वी गोव्यातील महादयी वन्यजीव अभयारण्याला भीषण आग लागली होती. जगातील आठ जैवविविधता हॉटस्पॉट पैकी एक असलेल्या पश्चिम घाटाचा हा विस्तिर्ण भाग गोव्याच्या इतिहासातील सर्वात भीषण आगीमुळे उध्वस्त झाला होता.

मागील वर्षी पुणे जिल्ह्यातील वन खात्याच्या जंगलातही वणवे पेटण्याच्या अनेक घटना घडल्या त्यात शेकडो एकर जंगलातील बहुमोल अशी निदर्गसंपदा जळून खाक झाली होती. आताही पुण्यातील पुण्यातील वनखात्याच्या जंगलात वणवे पेटल्याच्या बातम्या वर्तमान पत्रात वाचायला मिळत आहेत. वणवा पेटला की त्यात निसर्गाची कधीही न भरून येणारी हानी होते. साधारणतः उन्हाळ्यात या आगी लागतात आणि वणव्यांमुळेच या आगी लागतात. सामान्यतः सदाहरित जंगलांमध्ये आगी लागत नाही आग लागली तरी ती आपोआप विझतेही मात्र जोराने वारे वाहत असतील तर आग लवकर विझत नाही उलट ती आणखी वाढते. वनांमध्ये वाळलेले लाकूड, पाने, गवत असे अनेक घटक ठिणगीच्या संपर्कात येताच आग भडकते. मग झाडे पेट घेतात आणि मग मोठ्या वेगाने हा वणवा सर्वत्र पसरतो. डोंगराळ भागाचा भूगोल आणि भूरचना जटिल असल्यामुळेही वणवे विझवण्यात अनेकदा अडथळे येतात. गोव्यात तेच झाले. दुर्गम परिसर आणि खडे चढण यामुळे तेथील आग विझवण्यात अडचण आल्याचे सांगितले गेले. अर्थात जंगलांना आगी लागण्याच्या या घटना नव्याही नाहीत. गेल्या काही वर्षात वणवे लागण्याचे प्रमाण ज्याप्रकारे वेगाने वाढत आहे तो एक नव्या संकटाचा इशारा आहे. नैसर्गिक कारणामुळे जंगलांना वणवे लागण्याच्या घटना तर घडतातातच पण मानवनिर्मित वणवे लागण्याचा घटनांची संख्याही प्रचंड आहे. दरवर्षी उन्हाळा आला की जंगलांना आग लागण्याच्या घटना घडतात आणि त्यात बहुमोल अशी निसर्गसंपदा नष्ट होते केवळ जंगलांनाच नाही तर डोंगर, पर्वत, टेकड्यांवरील वृक्ष, वेली देखील या वनव्यांनी नष्ट होतात. विविध महापालिका, नगरपालिका, जिल्हापरिषदा, ग्रामपंचायती, राज्य व केंद्र शासन, राजकीय, सामाजिक व



सेवाभावी संघटना पावसाळ्यात वृक्षारोपण करतात. पावसाळ्यानंतरही ही वनसंपदा जतन करण्यासाठी या संघटना रोपट्यांना पाणी घालून ते वाढवतात. गाई, गुरे, बकऱ्यांपासून त्यांना जपतात. मात्र उन्हाळ्यात ठिकठिकाणी वणवे लागून व काही समाजकंटकामार्फत वणवे लावून वर्षानुवर्षे वाढवली गेलेली ही बहुमोल निसर्गसंपदा आगीच्या भक्ष्यस्थानी पडत असते. उन्हाळ्यात लागणारे हे वणवे नैसर्गिक असल्याचे भासवले जाते पण हे यातील बरेचसे वणवे मानवनिर्मितच असतात हे उघड सत्य आहे. काही समाजकंटक जाणीवपूर्वक शहराजवळच्या डोंगरावरील हिरवाईला वणवे लावून ती नष्ट करतात. चराई करिता चांगले गवत यावे या हेतूने हे वणवे लावले जातात. ( आग लागल्यावर चांगले व भरपूर गवत उगवते हा त्या मागचा उद्देश असतो. ) लाकूडफाटा, कोळसा मिळवण्यासाठी तसेच शेती व शिकारीसाठी जमीन तयार करण्यासाठी या बहुमोल निसर्ग संपदेला आगी लावल्या जातात. या आगीत वृक्ष, वनस्पती, वन्य जीवांची हानी, स्थलांतर यामुळे जे नुकसान होत असते त्याची भरपाई होण्यास खूप वर्षाचा कालावधी जातो. निसर्गाची अपरिमित हानी होते. या आगीमुळे पर्यावर्णाची हानी तर होतेच पण कार्बनडायऑक्साईडही वातावरणात वाढतो त्यामुळे पृथ्वीचे तापमान वाढते. एकूणच झाडांना लावल्या जाणाऱ्या या आगी म्हणजे राष्ट्रीय हानी आहे. असे असतानाही या मानवनिर्मित वणव्यांकडे केंद्र व राज्याचे वने आणि पर्यावरण खाते, पोलिसखाते दुर्लक्ष करीत असतात. आगी लावणाऱ्या या समाजकंटकांवर पोलीस तसेच प्रशासन कोणतीही कारवाई करीत नाही त्यामुळेच वणव्यांच्या घटनांत वाढ होताना दिसत आहे. काही भ्रष्ट कर्मचारी आणि अधिकारी यांच्यामुळे निसर्गाची कधीही भरून न निघणारी हानी होत आहे, म्हणूनच सरकारने या वणव्यांची गांभीर्याने दखल घ्यायला हवी. वणवे लावून पर्यावरणाची हानी करणाऱ्या समाजकंटकांवर कठोर कारवाई व्हायला हवी. वणव्यांमुळे पर्यावरणाची होणारी हानी टाळायची असेल तर मानवनिर्मित वणवे रोखायलाच हवे.

**– श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# युद्ध लांबले - टेंशन वाढले...

गेल्या महिन्यात अठ्ठावीस फेब्रुवारी ला अमेरिकन राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रंप, ईस्त्रायल चे अध्यक्ष नेत्यानाहु यांच्या अविचारीपणामुळे आणि मग्रुरीमुळे ईराण वर हल्ला केला, त्याला कारण दिले ईराण कडे अण्वस्त्रे असल्याचे मात्र खरे कारण अमेरिकेला इराणमधील सत्ता ऊलथवुन टाकत तेलावर ताबा मिळवायचा आहे. पहिल्याच दिवशी इराणवर जोरदार हल्ला करुन इराणच्या सर्वोच नेत्याची हत्या करुन अनेक बड्या नेत्यांची देखील हत्या केली. अमेरिकेला वाटले होते ईराण लवकरच शरण येईल आणि आपले ईप्सित साध्य होईल मात्र ईराण ने जोरदार प्रतिकार करत अमेरिका, ईस्त्रायल च्या नाकात दम आणला आहे. आता जवळपास तीन आठवडे ऊलटुन देखील ईराण लढत आहे. मात्र या युद्धामुळे जगाला वेठीस धरले गेले आहे त्याचा विपरीत इंधन, गॅस पुरवठ्यावर परिणाम झाला आहे, जागतिक पातळीवर ईंधनाच्या

किमती वाढल्या आहेत आणि पर्यायाने महागाई वाढत आहे. ईरणने आखाती देशातील अमेरिकन तळ असलेल्या दुबई, कुवेत, बहरिन, जॉर्डन, अबुधाबी, अशा अनेक देशांवर हल्ले केले यात मोठी जिवितहानी व वित्तहानी होत आहे. ऊर्जा श्वेत्रावर तर मोठा विपरीत परिणाम होत आहे. त्यातच ईराण ने हार्मुझ खाडी मार्ग बंद करून चांगलीच कोंडी केली आहे. केवळ चीन, रशिया यांच्या जहाजांची वाहतुक होत आहे. भारतात देखील दोन जहाजे आली. आता अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांची भाषा बदलु लागली आहे मात्र ईराण अजुनही हार मानेल अशी चिन्हे दिसत नाहीत. केवळ ऊर्जा श्वेत्रावरच नव्हे तर इतर व्यापारावर देखील परिणाम होत आहे. शांततेचे नोबेल पारितोषिक मिळविण्यासाठी अट्टाहास करणारे डोनाल्ड ट्रंप यांनी जगाला अशांतेत ढकलले आहे.

या युद्धाचा जसा जगावर परिणाम झाला आहे तसा तो भारतावर देखील होत आहे. युद्ध सुरु होताच भारतात घरगुती गॅस ६० रुपयांनी तर व्यापारी गॅस १२० रुपयांनी वाढला त्यामुळे इंधन तुटवडा होईल का अशी शंका जनतेमध्य निर्माण झाली, त्यात गॅस बुकिंग वर निर्बंध घातले गेले. सरकार देखील याबाबत योग्य वस्तुस्थिती जनतेसमोर मांडत नाही त्यामुळे पॅनिक वातावरण मोठ्याप्रमाणावर निर्माण झाले आहे. प्राईम पेट्रोल ची किंमत देखील वाढविण्यात आली आहे मात्र अजुन तरी पेट्रोल च्या किमती वाढल्या नाहीत. पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुका लक्षात घेऊन इंधन दर वाढविले जात नाही अशी जनतेची भावना आहे. युद्ध लांबल्याने आता दुष्परिणाम दिसु लागले आहेत मात्र ये तो सिर्फ झलक है असली पिक्चर बाकी है अशी परिस्थिती आहे.पावसाळा सुरू झाला कि मोठ्याप्रमाणावर खत टंचाई जाणवणार आहे आणि त्याचा परिणाम शेतीवर होणे अटळ आहे. आखाती देशातुन येणारे परदेशी चलन यावर विपरित परिणाम होणे निश्चित आहे त्याच बरोबर हजारो लाखो नागरिक या देशातुन परत येत आहे त्यांच्या रोजगाराचा प्रश्न आहेच. इंधन टंचाईच्या झळा हॉटेल, लहान मोठे कारखाने, ऊद्योग, लॉजिस्टिक कंपन्या यांना बसु लागला आहे आणि त्याचा परिणाम जनजीवनावर दिसु लागला आहे. अनेकांच्या नोकऱ्यांवर गदा येणार, ऊद्योगधंदे बंद होण्याची टांगती तलवार आहेच. ऊर्जा श्वेत्रावर तर मोठा विपरीत परिणाम होत आहे याचा फटका वीज निर्मिती, पुरवठा याला देखील बसणे अपरिहार्य आहे. आतातर देशांतर्गत हवाई वाहतुक करणाऱ्या कंपन्यांना वाढे वाढीची मुभा देण्यात आली आहे याचा आर्थिक भार हा जनतेवर पडणार आहे. ईराणने झार्मुज खाडी अजुनही खुली केली नाही, या सगळ्यात गॅस, तेलाची एकुण पाच जहाजे भारतात येऊन पोहचली मात्र ती केवळ एक दिवसाची सोय आहे.ऐकूणच युद्ध लांबल्यास त्याचा विपरीत जनतेवरच होणार आहे. युद्ध लांबले - टेंशन वाढले म्हणूनच केंद्रीय मंत्रिमंडळाची बैठक झाली आणि याबाबत गांभीर्याने विचार झाला. ऐकूणच येणारा काळ अमृतकाल नसेल तर संकटकाल असेल का?.

**- अनंत बोरसे**
**शहापूर जिल्हा ठाणे**
**९१५८४९५०३७**

## चविष्ट...

उघडी पडे भोंदूगिरी
बातमी रंगली चविष्ट
मसाला घालून त्यात
करे अधिक स्वादिष्ट

अंध श्रद्धेचे निर्मूलन
भोंदू करतात क्लिष्ट
अडथळा आणणारी
केवढी दांडगी लिस्ट

स्थिती वटारती डोळे
लावायले अघोरीदृष्ट
जख्मी करती तर्जनी
शत्रूवर आणू आरिष्ट

राजकीयवरदहस्त रे
देतात काही नादिष्ट
सुळसुळे काळीजादू
खतपाणी देई छंदिष्ट

नेते मंडळी हस्तक्षेप
लांबलांब पळे उदिष्ट
तोंडाचीबांधे मुसकी
प्रकरणे न्याय प्रविष्ट

बाबांच्या सेवेकरिता
बडे बडे ही समाविष्ट
भोजअसूनि स्वादिष्ट
चिवडत बसे उच्छिष्ट

**– हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६**


# मन खंबीर करण्याचे शिक्षणही द्यावे !

## वाचक पत्र

विज्ञान ज्या गतीने प्रगती करत आहे, त्याच गतीने जगभरातील आत्महत्यांचे प्रमाणही वाढत आहे. भारततही याचे प्रमाण लक्षणीय आहे. भारतात आत्महत्या करणाऱ्यांमध्ये दुर्दैवाने तरुणांचे प्रमाण अधिक आहे. १०-१५ हजारांच्या कर्जासाठी शेतकरी आत्महत्या करतो तर काळे धन उघड पडण्याच्या भयाने श्रीमंत आत्महत्या करतो. परीक्षेतील, नोकरी-व्यवसायातील, प्रेमप्रकरणातील अपयशाने, निराश झालेले तरुण आत्महत्या करत आहेत, तर दुर्धर आजाराने त्रस्त झालेले.

मुलं सांभाळत नसल्याने वयोवृद्ध आत्महत्या करत आहेत. सासरच्या छळाला कंटाळून नवविवाहिता आत्महत्या करतात. मनाचा कमकुवतपणा हेच आत्महत्येमागील प्रमुख कारण असून मन खंबीर कसे करायचे याबाबतचे शिक्षण कोणत्याही शाळा महाविद्यालयांतून दिले जात नाही, अत्यंत प्रतिकूल काळात शून्यातून स्वराज्य निर्माण करणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास आपण शालेय जीवनात अभ्यासाला आहे.

दुहेरी जन्मठेपेची शिक्षा झाली असतानाही देशभक्तीच्या विचारापासून तसूभरही न हलणाऱ्या स्वातंत्र्यवीर सावरकरांचे चरित्र आपण अभ्यासले आहे. देशासाठी हसत हसत फासाचा दोर गळ्यात घालणाऱ्या भगतसिंग, सुखदेव आणि राजगुरू यांच्या पराक्रमाच्या गोष्टी आपण



ऐकल्या आणि वाचल्या आहेत. या सर्वांची दुर्दम्य इच्छाशक्ती, ध्येयाप्रतीचा ध्यास आणि संकटावर मात करण्याची सिद्धता पाहिल्यावर आपले दुःख याहून मोठे आहे का याचा प्रत्येकाने विचार करायला हवा. सुशांत आत्महत्या प्रकरणावरून गेल्या तीन महिन्यांपासून देशभरातील वातावरण ढवळून निघाले आहे. बऱ्याचदा आत्महत्या करणाऱ्याप्रति समाजातून सहानुभूती व्यक्त केली जाते.

आत्महत्या करणे हा भारतीय दंड विधानानुसार गुन्हा असल्यामुळे आत्महत्या करणारा कोणीही असो त्याविषयी सहानुभूती नको. जीवनात येणाऱ्या चढ उतारांच्यावेळी निराश न होता प्रत्येक समस्येचा सामना कसा करायचा याविषयीचे शिक्षणही शालेय आणि महाविद्यालयीन अभ्यासक्रमात देण्याची आवश्यकता असून या शिक्षणाचा मुलांना व्यावहारिक आयुष्यात नक्कीच लाभ होईल.

**– सौ. मोक्षदा घाणेकर,**
**काळाचौकी, मुंबई**

## युद्धाची धग कोणालाही परवडणारी नाही...

पश्चिम आशियातील युद्धामुळे कच्च्या तेलाचा आणि नैसर्गिक गॅसच्या दराचा भडका उडाला आहे त्यामुळे पेट्रोल - डिझेलसह पेट्रोलियम पदार्थांच्या किमतीत वाढ होवून गॅस, प्लास्टिक, रसायने, खते महागल्याने पुरक उद्योगांवरील खर्चाचा भार वाढला आहे त्यामुळे महागाईचा भडका उडाल्याने सर्वसामान्य जनता मेटाकुटीला आली असल्याचे वास्तव नाकारता येत नाही आज रोजगाराच्या संधी कमी होत असताना अनेक छोटे - मोठे व्यवसाय अडचणीत येवून बंद पडत आहेत ज्याचा देशांतील जनजीवनावर गंभीर परिणाम होतो आहे होमुझची समुद्रधानी वाहतुकीसाठी बंद करण्याच्या इराणच्या भूमिकेमुळे अनेक देशांत इंधनाची टंचाई जाणवत असली तरी प्रमुख कारण इराण - इस्त्राईल अमेरिका युद्ध जागतिक वर्चस्वासाठी सुरु असल्याचे बोलले जात आहे पण याची झळ सर्वसामान्य जनतेला बसत आहे युद्धाची झळ घरापर्यंत, खिशाजवळ आली आहे युद्धामुळे जिवीत व वित्तहानी अतोनात आहे अनेक संसाधने निष्कारण भस्मसात होत आहेत याचा जागतिक पातळीवर विचार होणे अपेक्षित आहे दुसरीकडे या भिषण परिस्थितीचा गैरफायदा घेणारे नफेखोर सक्रिय झाले आहेत अनेक ठिकाणी चढ्या दराने गॅस सिलेंडरची विक्री होताना दिसून येते आहे नियमांची कठोर अमंलबजावणी होत नसल्याने असे प्रकार फोफावत आहेत याला सर्वस्वी प्रशासन आणि सरकारची उदासीनता जबाबदार आहे जागतिक स्तरावर युद्ध होणे कोणत्याही देशाला परवडण्यासारखे नाही त्यामूळे युद्ध थांबवणे गरजेचे आहे आंतरराष्ट्रीय समुदायाने हे युद्ध थांबविण्यासाठी आता तातडीने आणि गांभीर्याने पावले उचलण्याची वेळ आली आहे !

**- राजू जाधव, मांगूर जि.बेळगांव**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## टाकळी ढोकेश्वर येथे रंगणार दोन दिवस बैलगाड्यांच्या शर्यतीचा थरार
## टाकळी ढोकेश्वर येथील बनाईदेवी यात्रोत्सव




**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२३, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर पंचक्रोशीतील सर्वधर्मियांचे श्रद्धास्थान असलेले जागृत देवस्थान ग्रामदैवत माता बनाईदेवी यात्रेनिमित्त मंगळवार दि. २४ मार्च ते बुधवार २५ मार्च रोजी होणार आहे. त्यानिमित्ताने सकाळी ८ ते ६ वाजेपर्यंत बैलगाडा शर्यतीचे आयोजन करण्यात आल्याची माहिती यात्रा कमिटीचे अध्यक्ष संपतराव तराळ, बैलगाडा संघटनेचे अध्यक्ष बाळकृष्ण पायमोडे, अंकुश पायमोडे, विक्रम झावरे, मळिभाऊ रांधवण यांनी दिली.

मंगळवारी मुक्ताई देवीच्या यात्रेनिमित्त सकाळी ८ वा. काठी मिरवणूक, रात्री ८ वा. भव्य छबिना मिरवणूक रात्री १० वाजता अमर पुणेकर प्रस्तुत नटखट सुंदरा ऑर्केस्ट्राचा कार्यक्रमाने या ४ दिवसीय यात्रेची सांगता होणार आहे. बैलगाडा शर्यतींसाठी विजेत्यांना एकूण दोन लाख रुपयांपर्यंत बक्षीस ठेवण्यात आले आहे.

मंगळवारी सकाळी ८ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत बैलगाडा शर्यतींचे आयोजन केले आहे. प्रथम क्रमांकास ७१ हजार एक रुपये, द्वितीय क्रमांक ५१ हजार एक रुपये, तृतीय क्रमांक ३१ हजार एक रुपयांचे बक्षीस दिले जाणार आहे. एक नंबर फायनलसाठी १५ हजार रुपये, दोन नंबर फायनलसाठी ११ हजार रुपये, तीन नंबर फायनलसाठी ९ हजार रुपये, चार नंबर फायनलसाठी ७ हजार रुपये, ५ नंबर फायनलसाठी ५ हजार रुपये, घाटाचा राजा ५१०० हजार रुपये, शर्यतीमधील आकर्षक प्रथम फळीफोड (बारी) गाडा ५ हजार रुपये, द्वितीय फळीफोड ३ हजार रुपये, बक्षीस दिले जाणार आहेत.

## निघोजमध्ये भरवस्तीतील एटीएम फोडण्याचा प्रयत्न; चोरट्यांचा डाव फसला



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२३, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील निघोज येथील बसस्थानक परिसरातील एटीएम फोडण्याचा धाडसी प्रयत्न चोरट्यांनी केला. शनिवार (ता. २१) मध्यरात्री ही घटना घडली. तांत्रिक कारणामुळे पैसे चोरीला न गेल्याने मोठी वित्तहानी टळली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, शनिवार (ता. २१) रात्रीच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी बस स्थानक यासारख्या गजबजलेल्या परिसरातील एटीएमला लक्ष्य केले. चोरट्यांनी एटीएम मशीनचा वरचा भाग मोठ्या शिताफीने तोडला. मात्र, ज्या सुरक्षित कप्प्यात (तिजोरी) रोकड साठवलेली असते, तो भाग तोडण्यात चोरट्यांना यश आले नाही. बराच वेळ प्रयत्न करूनही पैसे हाती लागत नसल्याचे पाहून चोरट्यांनी तेथून पळ काढला. रविवारी (ता. २२) सकाळी ही बाब स्थानिकांच्या निदर्शनास आल्यानंतर परिसरात खळबळ उडाली. घटनेची माहिती मिळताच पोलीस उपनिरीक्षक शिवाजी कडूस यांनी तातडीने पथकासह घटनास्थळी धाव घेत पाहणी केली. घटनेचे गांभीर्य ओळखून पोलीस उपअधीक्षक शिरीष वमने, पोलीस निरीक्षक संतोष खेडकर आणि सहायक पोलीस निरीक्षक नितीन खंडागळे यांनी ही घटनास्थळाला भेट देऊन पाहणी केली.

**सीसीटीव्ही फुटेज ताब्यात घेण्याचे काम सुरू**

या प्रकरणी पोलिसांनी परिसरातील सर्व सीसीटीव्ही फुटेज ताब्यात घेण्याचे काम सुरू केले आहे. चोरट्यांनी मशीनचे नुकसान केले असले तरी रोकड सुरक्षित आहे. सीसीटीव्ही आणि इतर तांत्रिक पुराव्यांच्या आधारे तपास सुरू असून, लवकरच आरोपींना जेरबंद केले जाईल,असा विश्वास उपअधीक्षक शिरीष वमने यांनी व्यक्त केला आहे. या घटनेमुळे निघोज परिसरात रात्रीच्या गस्तीचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून, व्यापाऱ्यांनी आणि ग्रामस्थांनी सतर्क राहण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे.


## मेडिकल असोसिएशन, मिरा भाईंदरच्या वतीने डॉ.देसाईंना मानचा अनमोल रत्न पुरस्कार



**अक्षराज : घनश्याम आंबोकर**

**दि.२३, मिरा भाईंदर :** जेष्ठ डॉक्टर श्रवण देसाई ह्यांना मिरा भाईंदर अनमोल रत्न हा पुरस्कार महाराष्ट्र इंडियन मेडिकल असोसिएशन चे अध्यक्ष डॉ. संतोष कुलकर्णी ह्यांच्या हस्ते प्रधान करण्यात आला. हा कार्यक्रम दिनांक २१ मार्च २०२६ रोजी सायं ८ वा. जि.सी.सी.क्लब मिरा रोड मध्ये इंडियन मेडिकल असोसिएशन मिरा भाईंदर तर्फे आयोजित करण्यात आला. डॉ.श्रवण देसाई ह्यांच्या कार्याची प्रशंसा करणारा हा पुरस्कार आहे. मिरा भाईंदर अनमोल रत्न हा पुरस्कार मिळवणारे ते एक जेष्ठ डॉक्टर आहेत. डॉ.श्रवण देसाई मिरा भाईंदर चे जेष्ठ डॉक्टर आहेत ते मालेगाव हुन भाईंदर ला १९७६ आले व येथेच आपली व्यवसायिक सेवा सुरु केली. त्यांची दोन्ही मुलं डॉक्टर आहेत. डॉ विक्रांत देसाई इंडियन मेडिकल असोसिएशन, महाराष्ट्र राज्य संस्थेत सचिव म्हणून काम पाहतात. व आपल्या वडिलांचा सेवेचा वारसा पुढे नेत आहेत. मिरा भाईंदर च्या सर्व पूर्व अध्यक्ष कार्यक्रमाला उपस्थित होते. महाराष्ट्र मेडिकल असोसिएशन चे ट्रेसरर डॉ अमोल गिते, मिरा भाईंदर चे जेष्ठ डॉक्टर व मित्र एस.एन.अग्रवाल ह्यांनी डॉ.श्रवण देसाई चा परिचय करून दिला. डॉ बिपीन चेकर ह्यांनी त्यांना पितातुल्य आहेत सांगून गौरव केला. राष्ट्रीय मेडिकल असोसिएशन चे सचिव डॉ.वसंत लोंगे, डॉ नवनीत देसाई असे अनेक मिरा भाईंदर, मुंबई चे मान्यवर डॉक्टर व त्यांचा परिवार उपस्थित होते. कार्यक्रमाचे मनोरंजन करण्यासाठी डॉक्टरांनी रंगारंग कार्यक्रम प्रस्तुत केले.

## पनवेल मनपा मुख्यालयात शहीद दिनानिमित्त अभिवादन



**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.२३, पनवेल :** महानगरपालिका मुख्यालयात सोमवार, दिनांक २३ मार्च २०२६ सोमवार रोजी थोर स्वातंत्र्यसैनिक भगतसिंग, सुखदेव, राजगुरू यांच्या शहिद दिनानिमित त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमास परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे, उपायुक्त स्वरूप खारगे, उपायुक्त नानासाहेब कामठे, मुख्य लेखा परीक्षक निलेश नलावडे, उपसचिव अक्षय कदम, जनसंपर्क अधिकारी नितीन साके, महापालिका कर्मचारी उपस्थित होते.

# १ कोटी ८४ लाखांच्या विकासकामांनी जामगावला नवी दिशा
## आमदार काशिनाथ दातेंच्या माध्यमातून विकासाला वेग



आमदार काशिनाथ दाते यांच्या नेतृत्वामुळे जामगावच्या विकासाला खऱ्या अर्थाने गती मिळत आहे. अल्पावधीतच कोट्यवधींच्या निधीतून रस्ते व पायाभूत सुविधा उभारून त्यांनी जनतेच्या अपेक्षा पूर्ण केल्या आहेत. दाते हे केवळ आश्वासन देणारे नव्हे, तर प्रत्यक्ष काम करून दाखवणारे लोकप्रतिनिधी आहेत. त्यांच्या माध्यमातून गावागावांत विकासाची नवी दिशा निर्माण होत असून नागरिकांमध्ये विश्वास व समाधान निर्माण झाले आहे. आगामी काळातही त्यांच्या नेतृत्वाखाली मतदारसंघाचा सर्वांगीण विकास अधिक वेगाने होईल, असा विश्वास वाटतो.

**- सुभाष दुधाडे (भाजपा जिल्हा सरचिटणीस)**

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२३, पारनेर (अहिल्यानगर):** पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते यांच्या शुभहस्ते जामगाव,(ता.पारनेर) येथे विविध विकासकामांचे भूमिपूजन व लोकार्पण समारंभ उत्साहात पार पडला. सुमारे १ कोटी ८४ लाख रुपयांच्या निधीतून रस्ते व पायाभूत सुविधांच्या कामांना प्रारंभ झाल्याने गावाच्या विकासाला नवे बळ मिळाले आहे.

याप्रसंगी जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष वसंत चेडे, भाजपा जिल्हा सरचिटणीस सुभाष दुधाडे, उद्योजक दिलीप दाते, सरपंच बाळासाहेब माळी, बाळासाहेब सोबले, सिताराम खोडाळ, बबन पवार, मिनिनाथ शिंदे, प्रसाद मेहेर, समीर मांढरे, मनोज शिंदे, दिनकर सोबले, त्रिंबक पवार, बबन मेहेर, बाबाजी महांडुळे, रमेश आबुज, जालिंदर मेहेर, अरुण धुरपते, रोहीत शिंदे, सागर बर्वे, दत्तात्रय बांगर यांसह स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या निधीतून गावातील प्रमुख अंतर्गत रस्त्यांचे काँक्रीटीकरण, डांबरीकरण, तसेच विविध वस्ती व शिवार रस्त्यांचे मजबुतीकरण व सुधारणा करण्यात येणार आहे. यामध्ये डिकसळ शिव-सोबले बारव जुना पारनेर रस्ता, भांडगाव रस्ता-मेहर वस्ती रस्ता, पारनेर रस्ता-शिंदे वस्ती रस्ता, कावरे मळा रस्ता कॉक्रीटीकरण, जिजाबापू औटी वस्ती ते पाडळी शिवरस्ता, तसेच मुंजाळ दरा ते बैलटेक वस्ती रस्ता कॉक्रीटीकरण, बांगरवाडी व हिलाळ वस्ती परिसरातील रस्ते सुधारणा व मळगंगा परिसर कॉक्रीटीकरण अशा विविध कामांचा समावेश आहे. याशिवाय काही ठिकाणी नवीन रस्ते खडीकरण व कॉक्रीटीकरणाद्वारे विकसित करण्यात येणार आहेत.

यावेळी बोलताना आमदार दाते म्हणाले की, पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या सहकार्य व मार्गदर्शनामुळे मतदारसंघात या रस्त्यांच्या विकासकामांमुळे ऐतिहासिक जामगावची नवी ओळख निर्माण होणार असून दळणवळण अधिक सुलभ होईल. गावातील नागरिकांचे दैनंदिन जीवन अधिक सुरक्षित व सुलभ करण्यासाठी महायुती सरकारच्या माध्यमातून हा निधी मंजूर करण्यात आला आहे. हे पाऊल जामगावच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यंत महत्त्वाचे ठरेल.

# कुंडलवाडीत ईदूल फितरची नमाज संपन्न; ईदगाह समितीतर्फे मान्यवरांचा सत्कार

**अक्षराज : दत्ता हमंद**

**दि.२३, कुंडलवाडी (नांदेड) :** ईस्लामीक धर्माचा सर्वात मोठा सन ईदूल फितर रमजान ईद निमित्त शहरातील मुस्लिम समाज बांधव ईदगाह येथे सामुहिक नमाज आदा केली. यावेळी ईदगाह समितीचा वतीने मान्यवरांचा सत्कार करण्यात आले. मान्यवरातर्फे मुस्लिम बांधवांना ईदच्या शुभेच्छा देण्यात आले. शहरातील ईदगाह येथे दि.२१ मार्च २०२६ रोजी शहरातील सर्व मुस्लिम बांधव ईदगाह येथे शांततेत सामुहिक ईदची नमाज आदा केली. यावेळी हाफिज वसिम साब मिस्बाही ईद निमीत्त उपस्थिताना ईदचे महत्व आदी विषयावर प्रवचन देत ईदगाह समितीने मागील एक वर्षाचा कार्यकाळात ईदगाह येथे केलेल्या विकास कामा संदर्भात माहिती दिली.मुन्वर मस्जिदचे ईमाम हाफिज वसिम साब मिस्बाही यांच्या मागे शांततेत उत्साहात मुस्लिम समाज बांधव ईदची सामुहिक नमाज आदा केली.यावेळी खुदबाह आणि दुवा जामा मस्जिदचे ईमाम आलीम खुदूस साहाब यांनी केले.तदनंतर ईदगाह समितीचा वतीचे अध्यक्ष सय्यद मंसूर अली,उपाध्यक्ष मोहम्मद अफजल व समितीचे सदस्य यांच्यावतीने गजानन कोटलावार, सपोनी.ज्ञानेश्वर शिंदे,पोउनी.गजेंद्र मांजरमकर,तलाठी पवण ठकरोड,भाजप गटनेते रमेश ईरलावार,नगरसेवक प्रदीप खेळगे,भाजपचे नवनियुक्त मंडळ अध्यक्ष बंटी ठकरवाड यांचा सत्कार करण्यात आला. मान्यवरातर्फे मुस्लिम समाजबांधवांना ईदच्या शुभेच्छा देण्यात आले.



यावेळी ईदगाह समितीचे अध्यक्ष सय्यद मंसूर अली,उपाध्यक्ष मोहम्मद अफजल,ईदगाह समितीचे माजी अध्यक्ष सय्यद ईसताक अली,रशिदखान पठाण, गुलजार मस्जिद हाफीज गुलाम यासीन साहाब,हाफीज अमरूल हसन साहाब,हाफीज मुस्ताख साहाब,मुन्वर मस्जिद अध्यक्ष मोहम्मद नजिर मोहम्मद ईसाख,पठाण नजिर मौलाना,माजी नगरसेवक शेख बशीर सहाब,गुलजार मस्जिद अध्यक्ष हाजी ईब्राहीमसाब,उपाध्यक्ष शेख बशिर साहाब, बिलाल मस्जिद अध्यक्ष पठाण जलिल सहाब,उपाध्यक्ष हाजी मजाहिद साहाब,ईदगाह समितीचे सदस्य अ.जावेद हाजी.अ.जलिल,शेख वहाब सिरजोदीन,हाजी अब्दुल करीम खुरेशी, शेख सलीम अहेमदजानी,शेख अलीम अब्दुलमियॉ,पठान रियाज मैनोदीन,शेख बशीर मौलाना,आदीसह मोठ्यासंख्येत मुस्लिम समाज बांधव उपस्थित होते. विशेष म्हणजे नगरपालिका प्रशासनातर्फे ईदगाह परिसरात स्वच्छता आणि मुलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात आले होते.याबद्दल ईदगाह समितीचे उपाध्यक्ष मोहम्मद अफजल नगर परिषद प्रशासन,पोलिस प्रशासन आणि महसुल प्रशासनाचे आभार मानले.

यासाठी ईदगाह समितीतर्फे पाठपुरावा करण्यात आला होता. ईदगाह येथे कायदा व सुव्यवस्था आबादीत नादावे यासाठी सपोनी. ज्ञानेश्वर शिंदे,पोऊनी.गजेंद्र मांजरमकर कडक पोलिस बंदोबस्त तैनात केले होते.

# जेवढी तत्परता अधिक्षकांच्या निलंबनासाठी दाखवली तेवढी तत्परता पाटण तालुक्यात रखडलेल्या प्रश्नांना दाखवावी

**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.२३, पाटण (सातारा) :** सातारा जिल्हा परिषद अध्यक्ष, उपाध्यक्ष निवडीच्या नाट्यमय घडामोडीत पाटण तालुक्यातील लोकप्रतिनिधी व जिल्ह्याच्या पालकमंत्र्यांच्या बोटाला लागले की विधिमंडळात प्रश्न उपस्थित केला गेला आणि विधानपरिषदेच्या सभापतींनी सातारा जिल्हा पोलीस अधीक्षकांना निलंबन करण्याचे निर्देश दिले. जिल्हा परिषद अध्यक्ष, उपाध्यक्ष निवडीवेळी झटापट झाली जखम झाली हे सगळं खरं असलं तरी माननीय लोकप्रतिनिधी आणि सभापतींनी जेवढी तत्परता अधिक्षकांच्या निलंबनासाठी दाखवली तेवढी तत्परता पाटण तालुक्यात रखडलेल्या अनेक प्रश्नला दाखवली का..? गेली ७० वर्ष कोयना धरण ग्रस्तांचे प्रश्न खितपत पडलेले आहेत.धरणग्रस्तांच्या जखमा त्याच्या यातना अजूनही संपलेल्या नाहीत. किरकोळ बोटाला लागलेल्याची तत्परता ऐवढी झपाट्याने होत असेल तर वर्षोनुवर्षे धरणग्रस्तांच्या असलेल्या जखमांची दखल तेवढ्याच तत्परतेने विधीमंडळ का घेत नाही असा प्रश्न धरणग्रस्तांच्या वतीने मनसे अनुशक्ती विधानसभा मतदारसंघाचे अध्यक्ष रवींद्र शेलार यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केला आहे.



रविंद्र शेलार यांनी प्रसिद्धी पत्रकात पुढे म्हणाले की, पाटण तालुक्यातील लोकप्रतिनिधींना किरकोळ जखम झाली म्हणून विधिमंडळात प्रश्न उपस्थित केला गेला आणि तत्काळ कारवाई झाली. सातारा जिल्हा परिषद निवडणुकीत राजकीय रणधुमाळीत झटापट होऊन काहीजण जखमी झाले, ही बाब निश्चितच गंभीर आहे; मात्र त्यावर इतक्या घाईघाईने पोलीस अधीक्षक यांचे निलंबनाची कारवाई करणे योग्य नाही. संबंधित प्रकरणाची निःपक्षपाती चौकशी होणे आवश्यक होते.

पोलीस दल हे अत्यंत कठीण परिस्थितीत कार्य करणारे घटक आहे. एका पोलीस भरतीसाठी हजारो नव्हे तर लाखो उमेदवार अर्ज करतात. सुमारे ७ हजार जागांसाठी ४-५ लाख अर्ज येतात. त्यातून शारीरिक, लेखी आणि मानसिक कसोट्यांमधून पात्र ठरूनच उमेदवार पोलीस दलात दाखल होतो. धावणे, गोळाफेक, मैदानी चाचण्या यामध्ये एका सेकंदाने किंवा छोट्याशा फरकाने उमेदवार बाद होतो. अशा कठोर परिश्रमातून घडलेल्या पोलीस अधिकाऱ्यांना घरघडी किंवा अन्य अवमानकारक शब्द वापरणे अत्यंत चुकीचे आहे. पोलीस दलाला कोणतेही संघटनात्मक संरक्षण नसल्याने त्यांच्या बाजूने ठाम भूमिका घेणारी यंत्रणा नसते. त्यामुळे एखाद्या लोकप्रतिनिधीने विधिमंडळात मुद्दा उपस्थित केला की, त्यावर तातडीने कारवाई होते ही बाब पोलिसांसाठी अन्यायकारक असल्याचे रवींद्र शेलार यांनी नमूद केले.

पाटण तालुक्यातील लोकप्रतिनिधींच्या कडून जिल्ह्यातील व तालुक्यातील उच्च पदावर असणाऱ्या अनेक अधिकाऱ्यांना एकेरी शब्दाने संबोधले जाते. त्यांचा वापर हेच लोकप्रतिनिधी घरगडी म्हणून करतात. चुकीचे समर्थन करत पोलिसांना घरगडी म्हणतात हे कोणत्याही लोकप्रतिनिधींना शोभण्यासारखे आहे का..? हेच तालुक्यातील व जिल्ह्यातील अधिकाऱ्यांच्यावर दबाव आणून पोलीस यंत्रणा व महसूल यंत्रणा राबवत असतात हे त्यांनीच एकदा स्वतःच्या मनाने विचार करावा मगच सातारा पोलीस अधीक्षक यांच्यावर आरोप करावेत असे रवींद्र शेलार यांनी म्हणलं आहे.

ते पुढे म्हणाले की दुसरीकडे, पाटण तालुक्यातील धरणग्रस्तांची परिस्थिती अत्यंत गंभीर आहे. कोयना धरण उभारून तब्बल ७० वर्षे उलटली तरी पुनर्वसनाचा प्रश्न पूर्णतः मार्गी लागलेला नाही . व्याघ्र प्रकल्पामुळे विस्थापित होणाऱ्यांचे आजही प्रश्न लोंबकळत आहेत. अनेक कुटुंबे अजूनही न्यायाच्या प्रतीक्षेत आहेत.

विविध धरणांमुळे जमीन गमावलेल्या नागरिकांना योग्य मोबदला, पर्यायी जमीन, तसेच मूलभूत सुविधा मिळालेल्या नाहीत. रस्त्यांची कामे रखडलेली आहेत. नागरिकांना वारंवार शासन दरबारी चकरा माराव्या लागत असूनही त्यांच्या प्रश्नांकडे अपेक्षित गांभीर्याने पाहिले जात नाही. प्रकल्पग्रस्तांच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष करून त्यांच्या जखमेवर मीठ चोळण्याचे काम वर्षोनुवर्षे होत आहे. एखाद्या घटनेवर प्रशासन आणि शासन इतक्या वेगाने निर्णय घेत असेल, तर हीच तत्परता सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नांबाबत का दाखवली जात नाही..? ज्या विधानपरिषदेच्या सभापतींवर यापूर्वी विविध आरोप झाले होते, त्यांनी या घटनेची तात्काळ दखल घेतली. जर त्यांच्या अंगी इतकी कार्यक्षमता असेल, तर पाटण तालुक्यातील धरणग्रस्त, रस्ते, पायाभूत सुविधा यांसारख्या प्रश्नांना प्राधान्य देणे गरजेचे आहे.असे शेवटी रवींद्र शेलार यांनी म्हटले आहे.

**पोलीस यंत्रणेला न्याय मिळावा आणि धरणग्रस्तांच्या प्रश्नांना प्राधान्याने सोडवावे.**

– सध्या आपण अनुशक्ती नगर विधानसभा मतदारसंघ येथे विभाग अध्यक्ष म्हणून कार्यरत असलो तरी पाटण तालुक्याशी असलेली नाळ जपण्यासाठीच आपण ही भूमिका मांडली आहे. गेल्या दहा वर्षांत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या माध्यमातून आपण व पाटण तालुक्यातील मनसेच्या कार्यकर्ते पदाधिकाऱ्यांनी तालुक्यात विविध आंदोलने व चळवळी केल्या असल्याचेही त्यांनी सांगितले. पोलीस यंत्रणेला न्याय मिळावा आणि धरणग्रस्तांच्या प्रश्नांना प्राधान्याने सोडवावे, अशी अपेक्षा व्यक्त करत रवींद्र शेलार यांनी शासनाला जनतेच्या प्रश्नांकडे अधिक संवेदनशीलतेने पाहण्याचे आवाहन त्यांनी पत्रकात केले आहे.

# म्हैसगावमध्ये जनआशीर्वाद यात्रेत प्राजक्त तनपुरे यांचे सरकारवर टीकास्त्र



**अक्षराज : प्रमोद डफळ**

**दि.२३, म्हैसगाव (अहिल्यानगर) :** आगामी निवडणूक लढवण्याबाबतचा निर्णय वरिष्ठ नेत्यांशी चर्चा करूनच घेतला जाईल, असे स्पष्ट करत माजी राज्यमंत्री प्राजक्त तनपुरे यांनी जनआशीर्वाद यात्रेदरम्यान सरकारच्या धोरणांवर जोरदार टीका केली. मागील निवडणुकीत महाविकास आघाडीच्या उमेदवारांचा पराभव हा 'लाडकी बहीण' योजनेविषयी करण्यात आलेल्या अपप्रचारामुळे झाल्याचा आरोप त्यांनी केला. तसेच, सरकारने २५ ते ३० टक्के लाभार्थी महिलांचे पैसे बंद केल्याचा दावा करत तालुक्यातील सुमारे २७ हजार महिलांना या योजनेपासून वंचित ठेवण्यात आल्याचे ते म्हणाले.

म्हैसगाव येथे झालेल्या सभेच्या अध्यक्षस्थानी बाबासाहेब हुलुळे होते. व्यासपीठावर मच्छींद्र सोनवणे, किसन जवरे, बापूसाहेब गाढे, भारत भुजाडी, दत्ता कवाणे, ज्ञानेश्वर बाचकर आणि बापूसाहेब गागरे आदी मान्यवर उपस्थित होते. राहुरी-पाथर्डी-नगर मतदारसंघातील पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सुरू असलेल्या जनआशीर्वाद यात्रेच्या दुसऱ्या दिवशी तनपुरे यांनी दरडगाव थडी, शेरी चिखलठाण, म्हैसगाव व कोळेवाडी या गावांना भेट देत नागरिकांशी संवाद साधला. यावेळी बोलताना त्यांनी सांगितले की, शासनाने शेतकऱ्यांसाठी उपयुक्त ठरणारी एक रुपयाची पीक विमा योजना बंद केली असून निवडणुकीच्या तोंडावर सुरू केलेल्या अनेक योजनाही थांबवण्यात आल्या आहेत. सामाजिक न्याय व आदिवासी विकास मंत्रालयाचा निधी इतर योजनांकडे वळवण्यात आल्याचा आरोपही त्यांनी केला. सत्तेत असताना मतदारसंघातील विकासकामांमध्ये कोणतीही कमतरता ठेवली नाही, असे सांगताना विरोधी पक्षात गेल्यानंतरही शेतकऱ्यांचे प्रश्न, पीक विमा भरपाई, वीज समस्या, विद्यार्थ्यांचे मुद्दे तसेच बिबट्याच्या वाढत्या संकटावर विधानसभेत आवाज उठवला असल्याचे त्यांनी नमूद केले. भविष्यात कोणत्याही सरकारी प्रकल्पासाठी मतदारसंघातील जमीन जाऊ देणार नाही, अशी ग्वाही त्यांनी दिली. कार्यक्रमात चांगदेव चोपडे, रामदास बाचकर आणि आबासाहेब काळनर यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. जनआशीर्वाद यात्रेला नागरिकांनी मोठा प्रतिसाद दिल्याचे यावेळी दिसून आले.

# 'कहीं हम भूल न जायें' अभियानांतर्गत, 'आंबेडकर मेळा ऑन व्हील्स'ला मुंबईकरांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.२३, मुंबई :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती निमित्ताने महाराष्ट्रातील संपूर्ण ३६ जिल्ह्यामध्ये आंबेडकरवादी चळवळीप्रती जनजागृती निर्माण करण्याकरिता २ महिन्यांच्या कालावधीत ७ टप्प्यांमध्ये चालत्या फिरत्या 'आंबेडकर मेळा ऑन व्हील्स'चे भव्य राज्यव्यापी आयोजन सुरू आहे. मान्यवर कांशीरामजी यांच्या जयंती पासून म्हणजे १५ मार्च २०२६ पासून मेळ्याची सुरुवात झाली असून, मेळ्याचे समापन दिनांक १७ मे २०२६ रोजी आठव्या बहुजन परिषदेच्या माध्यमातून संपन्न होणार आहे.

या आयोजनाद्वारे फुले-शाहू-आंबेडकरांचे परिवर्तनवादी विचार महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यांमध्ये पोहोचविण्याचा उदात्त हेतू आहे. प्रत्येक जिल्ह्यातील तहसील आणि प्रमुख शहरांमध्ये जाऊन, चौकाचौकांमध्ये नुक्कड सभा घेऊन महापुरुषांच्या विचारसंवर्धनाचे कार्य जोमाने सुरू आहे.

या शृंखलेमध्ये दि.२०, २१ आणि २२ मार्च ला ह्या मेळ्याद्वारे मुंबईमधील मानखुर्द, गोवंडी, चेंबूर, पालघर, ठाणे, दादर आणि सानपाडा इत्यादी ठिकाणी फिरताना १४ नुक्कड सभा घेऊन, बहुजन वस्त्यांमध्ये जाऊन आणि चौका-चौकांमध्ये थांबून महापुरुषांच्या चळवळीचा विचार जनमानसांपर्यंत पोहोचविला. तसेच २ ठिकाणी जाहीर सभा घेण्यात आल्या.

या मेळ्यामध्ये विद्यार्थी, महिला, पुरुष व कर्मचारी या सर्वांचा समावेश दिसत आहे. 'आंबेडकर मेळा ऑन व्हील्स'च्या या राज्यव्यापी कार्याला महाराष्ट्रातील जनतेने सहकार्य करावे तथा आंबेडकरवादी चळवळ



गतिमान करण्यासाठी भीमजयंतीपुरते मर्यादित न राहता राज्यातील जनतेने जीवनभरासाठी बाबासाहेबांना अपेक्षित चळवळीसाठीचा कृती कार्यक्रम हाती घ्यावा, असे कळकळीचे आवाहन कहीं हम भूल न जायें अभियानाचे ॲड. अतुल पाटील यांनी केले आहे.

# संसार साहित्यासाठी सोयगाव च्या कामगारांकडून एक ते दीड हजाराची उकळणी

**अक्षराज : पूनम परदेशी**

**दि.२३, सोयगाव (छ.संभाजीनगर) :** इमारत व इतर बांधकाम कामगारांसाठी शासन देत असलेल्या विविध लाभामध्ये संसार साहित्य वाटपाकरिता सोयगाव तालुक्यासाठी अधिकृत केंद्र नसल्याने भांडे मिळवून देण्यासाठी कामगारांचीएका खाजगी एजंट कडून लूट केली जात आहे. इमारत व इतर बांधकाम कामगारांसाठी विविध कल्याणकारी योजना आणलेल्या आहेत. यात नोंदणी केल्यानंतर सर्वात प्रथम कामगार पेटी सेप्टी किट दिली जाते यात कामावर लागणाऱ्या विविध वस्तू असतात त्यानंतर संसार साहित्य दिले जाते यात संसार उपयोगी ३० भांडे दिले जातात. सोयगाव ला हे साहित्य वाटप चे अधिकृत केंद्र नसल्यामुळे इतर केंद्र निवडावे लागतात. याचाच गैरफायदा घेऊन काहींनी कामगारांची आर्थिक लूट सुरु केली आहे. ऑनलाईन पावतीवर कुणालाही पैसे देण्याची गरज नाही अशी सूचना केली असतांना एक हजार ते दीड हजार रुपये उकळले जात आहे. आपण पैसे दिले नाही तर आपल्याला भांडे मिळणार नाही या भीतीने सर्व कामगार पैसे देत आहे.

**केंद्र मॅनेज करून भांडे देतो...**

सोयगाव येथे विघ्नहर्ता मल्टीसर्व्हिसेस ऑनलाईन केंद्रात शेकडो कामगारांना केवायसी करून भांडे वाटप करण्यात येत आहे याविषयी अमोल क्षीरसागर या केंद्र चालकाला विचारणा केली असता मी अधिकृत असलेले एक केंद्र मॅनेज केले असून लोकांना सिल्लोड किंवा इतर ठिकाणी जाण्याची गरज नाही सोयगाव मध्ये ही सुविधा उपलब्ध करून दिली असल्याचे त्यांनी सांगितले.

अधिकृत केंद्र मॅनेज कसं होऊ शकतं केंद्र चालक कामगारांचे साहित्य इतर व्यक्ती कडे कसे काय दिले जातात आशा अनेक शंका उपस्थित होत आहे.

**सोयगावला केंद्र नसल्याने होत आहे लूट...**

कामगारांना दिले जाणारे साहित्य वाटप करण्याचे अधिकृत केंद्र नसल्याने सोयगाव तालुक्यातील कामगारांना सिल्लोड, नाचणवेल, वैजापूर आदी ठिकाणी साहित्य घ्यायला जावे लागत आहे याचाच गैरफायदा घेऊन सोयगाव तालुक्यातील कामगारांची लूट सुरु आहे. याविषयी सामाजिक कार्यकर्ते शंकर जेठे यांनी कामगारांची होणाऱ्या लूट विषयी एक व्हिडीओ काढून सोशल मीडिया वर पसरवून लोकांची लूट थांबविण्याची मागणी केली आहे. तशी तक्रार तहसीलदार यांच्या कडे केली आहे.

# बाभूळवाडे च्या केदारेश्वर सेवाभावी ट्रस्टचे अध्यक्ष बळवंत शिर्के यांचे निधन

**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.२३, सुपा (अहिल्यानगर) :** पारनेर - राज्यात प्रसिद्ध असलेल्या बाभूळवाडे येथील केदारेश्वर देवस्थान चे अध्यक्ष बळवंत शिर्के यांचे दीर्घ आजाराने दुःखद निधन झाले. बाभूळवाडे येथे २०१९-२० पर्यंत त्यांचा व देवस्थान चे सचिव भिकाजी जगदाळे सर यांचा परिचय नव्हता, परंतु केदारेश्वर देवस्थानच्या अध्यक्षपदी फेरनिवड झाली व भिकाजी जगदाळे यांची सचिव पदी निवड झाल्यानंतर या दोघांचा परिचय झाला.

देवस्थानच्या अध्यक्षपदी फेरनिवड झाल्यांनतर प्रकृती अस्वास्थामुळे प्रबळ इच्छा असून देखील त्यांना मागील ५ वर्षात एकदा ही गावी येता आले नाही व त्यांची केदारेश्वराचे दर्शन घेण्याची इच्छा शेवटपर्यंत अपूर्णच राहिली. देवस्थानच्या जागेचा विषय मार्गी लागावा अशी त्यांची इच्छा होती व त्यासाठी ते आजारी असूनही सर्वतोपरी प्रयत्न करत असत व प्रत्येक मिटिंग अथवा महाशिवरात्री च्या वेळी आवर्जून फोन करून मार्गदर्शन करत असत. त्यांचा जन्म पारनेर तालुक्यातील नांदूर पठार येथे झाला. बालपण व प्राथमिक शिक्षण बाभूळवाडे येथे पूर्ण केल्यांनतर इयत्ता ८ वी ते ११ वी पर्यंतचे शिक्षण वडझिरे येथील जनसेवा विद्यालयात झाले.

दिवंगत बळवंत शिर्के यांचे वडील धोंडीबा शिर्के हे नोकरी निमित्त मुंबईत असल्यामुळे त्यांचे महाविद्यालयीन शिक्षण मुंबईत पूर्ण झाले. पदवीच्या अंतिम वर्षाला असताना फेब्रुवारी १९७३ मध्ये लिपिक म्हणून शासकीय सेवेत रुजू झाले. १९७४ मध्ये पदवी प्राप्त झाली व १९७८ मध्ये दिवंगत माजी मंत्री शंकरराव काळे यांची भाची प्रमिला जगन्नाथराव जगताप यांच्यासोबत विवाह झाला. शासकीय सेवेत असताना दिवंगत शंकरराव काळे, दिवंगत मंत्री मधुकरराव पिचड, सलीम झकेरिया व माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील यांचे राज्यमंत्री व उपमुख्यमंत्री आस्थापनेवर स्वीय सहाय्यक, विशेष कार्यकारी अधिकारी, खाजगी सचिव म्हणून काम करण्याची त्यांना संधी मिळाली.



त्या काळात गावच्या विकासासाठी अनेक विकास कामे करून घेता आली. प्रामुख्याने बाभूळवाडे येथे रयत शिक्षण संस्थेचे माध्यमिक विद्यालय सुरू करणे, बाभूळवाडे फाटा ते बाभूळवाडे गाव हा रस्ता १९९० व २००४ अशा दोन वेळा डांबरीकरण करून घेणे, २००६ ते २००८ दरम्यान स्वयंभू श्री केदारेश्वराच्या डोंगरावर शिवभक्तांसाठी आवश्यक त्या सोयी सुविधा निर्माण करणे, यामध्ये प्रामुख्याने 'क' वर्ग तीर्थक्षेत्र योजनेअंतर्गत संरक्षण भिंत, पाणीपुरवठा योजना, बाग-बगीचा, विद्युत सुशोभीकरण, भक्तनिवास, स्वतंत्र स्वच्छतागृह, मारुती मंदिर ते केदारेश्वर डोंगर पायथा सिमेंट रस्ता, २५:१५ या अर्थसंकल्पीय शीर्षाखाली भुयारी गटार योजना, गावांतर्गत सिमेंट काँक्रीटचे रस्ते, स्मशानभूमी सुधारणा, मुक्ताई मंदिर सभामंडप , १३३ के.व्ही. पावर स्टेशन व इतर विकास कामांचा यात समावेश होतो. ३६-३७ वर्षाच्या प्रदीर्घ शासकीय सेवेतून वयोमानानुसार ऑक्टोबर २००९ रोजी ते सेवानिवृत्त झाले. त्यानंतर माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील यांच्या सेवेत अनेक निमशासकीय संस्थांवर काम करण्याची संधी त्यांना मिळाली.

२०१४ साली झालेल्या ग्रामपंचात निवडणुकीच्या वेळी त्यांच्या सूचनेनुसार बाभूळवाडे ग्रामपंचायत निवडणूक बिनविरोध करण्यात आली व गावाने तंटामुक्तीचे बक्षीस मिळविले. त्यांच्या या सर्व भरीव योगदानामुळेच २०११ मध्ये जेव्हा स्वयंभू केदारेश्वर देवस्थान ट्रस्टची स्थापना केली, तेव्हा गावाने त्यांची एकमताने तह्यातअध्यक्षपदी निवड करून गावानेही त्यांचा यथोचित सन्मान ठेवला. त्यांनी जी जी कामे केली, ती कामे स्वयंभू श्री केदारेश्वराने माझ्याकडून पूर्ण करून घेतली.

मी फक्त निमित्त होतो. तोच करता-करविता आहे. असे ही ते नेहमी म्हणत. अशा या गावच्या भूमिपुत्राला बाभूळवाडे श्री केदारेश्वर सेवाभावी ट्रस्ट, आपलं गाव फाऊंडेशन, ग्रामपंचायत, सेवा विकास सोसायटी, केदारेश्वर विद्यालय, केदारेश्वर पतसंस्था, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ व सर्व ग्रामस्थांच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली.

## थोडक्यात

# कहीं हम भूल न जायें अभियानांतर्गत 'आंबेडकर मेळा ऑन व्हील्स' सानपाड्यात जाहीर सभा संपन्न




**अक्षराज : विनोद धुरंधर**

**दि.२३, सानपाडा (नवी मुंबई) :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त महाराष्ट्रभर राबविण्यात येत असलेल्या कहीं हम भूल न जायें या जनजागृती अभियानांतर्गत 'आंबेडकर मेळा ऑन व्हील्स' या भव्य उपक्रमाची साखळी सानपाडा, नवी मुंबई येथे जाहीर सभेच्या माध्यमातून उत्साहात पार पडली. फुले-शाहू-आंबेडकर यांच्या परिवर्तनवादी विचारांचा प्रसार राज्याच्या कानाकोपऱ्यात करण्याच्या उद्देशाने हा राज्यव्यापी मेळा आयोजित करण्यात आला आहे. दोन महिन्यांच्या कालावधीत सात टप्प्यांत महाराष्ट्रातील सर्व ३६ जिल्ह्यांमध्ये हा मेळा पोहोचणार असून, प्रत्येक जिल्ह्यातील तालुका व प्रमुख शहरांमध्ये जाऊन नुक्कड सभा आणि जाहीर कार्यक्रमांच्या माध्यमातून समाजप्रबोधनाचे कार्य सुरू आहे.

१५ मार्च २०२६, मान्यवर कांशीरामजी यांच्या जयंतीदिनी या मेळ्याची सुरुवात झाली असून, १७ मे २०२६ रोजी आठव्या बहुजन परिषदेच्या माध्यमातून या उपक्रमाचा समारोप होणार आहे.

रविवार, दि. २२ मार्च २०२६ रोजी सानपाडा येथे झालेल्या जाहीर सभेचे अध्यक्षस्थान ॲड. अतुल पाटील यांनी भूषविले. आपल्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी, आंबेडकर मेळा ऑन व्हील्स हा केवळ कार्यक्रम नसून चळवळीला नवसंजीवनी देणारा उपक्रम आहे. भीमजयंतीपुरते मर्यादित न राहता, समाजाने बाबासाहेबांच्या विचारांनुसार आयुष्यभरासाठी कृतीशील कार्यक्रम हाती घ्यावेत, असे कळकळीचे आवाहन केले. या सभेला ॲड. रितेश पाटील व ॲड. अश्विनी मून यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाची प्रस्तावना महेश साखरे यांनी केली, तर रघुनाथ कांबळे यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रभावी संचालन व आभारप्रदर्शन प्रभाकर पगारे यांनी केले. ही जाहीर सभा बोधिवृक्ष बुद्ध विहार, सानपाडा, नवी मुंबई यांच्या वतीने आयोजित करण्यात आली होती. या प्रसंगी मोठ्या संख्येने अनुयायी व नागरिकांनी उपस्थित राहून कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

# 'बोगस ग्रामीण' विद्यार्थांमुळे खरे ग्रामीण विद्यार्थी नवोदय प्रवेशापासून वंचित

## चिमूर तहसीलदार यांना पालकांचे निवेदन




**अक्षराज : नितेश पाटील**

**दि.२३, चिमूर (चंद्रपूर) :** ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उच्च दर्जाचे इंग्रजी शिक्षण मिळावे म्हणून जवाहर नवोदय विद्यालयात ७५ टक्के जागा ह्या ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी राखून ठेवलेल्या असताना सुद्धा नगरपरिषद चिमूर, नगरपंचायत सिंदेवाही, नगरपरिषद ब्रम्हपुरी व संपूर्ण चंद्रपूर जिल्ह्यातील इतर शहरी विद्यार्थ्यांनी ग्रामीण मधून फॉर्म भरून नवोदय यादीत स्थान मिळवून ग्रामीण विद्यार्थ्यांना नवोदय प्रवेशा पासून वंचित केले असा आरोप ग्रामीण भागातील पालकांनी केला आहे.तसे निवेदन जिल्हाधिकारी, तहसीलदार यांना दिले. नगरपंचायत, नगर परिषद, नगरपालिका, महानगरपालिका क्षेत्रातील शाळामधील विद्यार्थी शहरी संबोधित असून त्यांना त्यांच्या क्षेत्रात भरपूर भौतिक व शैक्षणिक सुविधा उपलब्ध असून सुद्धा त्यानी ग्रामीण मधून प्रवेश यादीत स्थान मिळवून खऱ्या ग्रामीण, गरीब विद्यार्थ्यांवर अन्याय केला असल्याचे नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या नवोदय निवड यादीत दिसून येत आहेत. अशा २० ते २५ च्या संख्येत असणाऱ्या बोगस ग्रामीण विद्यार्थ्यांना संबंधित तालुक्यातील मा. तहसीलदार महोदयांनी ग्रामीण चे प्रमाणपत्र देऊ नये. संबंधित बोगस विद्यार्थ्यांची वर्ग ३, ४ व ५ची गुणपत्रिका व त्याची शाळा ग्रामीण की शहरी क्षेत्रात येते याची रीतसर चौकशी करूनच त्यांना प्रमाणपत्र दयावे याकरिता ग्रामीण पालकांनी निवेदन चिमूर तहसीलदार श्रीधर राजमाने यांचे मार्फत जिल्हाधिकारी चंद्रपूर यांना निवेदन देण्यात आले. अशा नगर पंचायत, नगर परिषद, नगर पालिका क्षेत्रातील बोगस ग्रामीण विद्यार्थ्यांना नवोदय मध्ये प्रवेश देऊ नये व खऱ्या ग्रामीण विद्यार्थ्यांवरील शैक्षणिक व सामाजिक अन्याय दूर करावा अशी मागणी ग्रामीण भागातील पालकांनी केली आहे.

# ज्याच्याकडे कौशल्य आहे, त्याकडे संधी आपोआप येतील - संजीव चव्हाण



**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.२३, पाटण (सातारा) :** आजचा काळात पदवी सोबत तुमच्या जवळ कौशल्य असणे गरजेचे झाले आहे. त्यामुळे कौशल्य आपल्या हातात असणे अधिक महत्त्वाचं बनलं आहे. शिक्षण तुम्हाला उभं करतं, पण कौशल्य तुम्हाला पुढे नेतं! असे प्रतिपादन कोयना एज्युकेशन सोसायटी चे संचालक संजीव चव्हाण यांनी केले. ते येथील इंस्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट, पाटण येथे उज्ज्वल भविष्य आणि कौशल्य विकास या विषयावर आयोजित केलेल्या चर्चा सत्रात ते बोलत होते. यावेळी इंस्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट, पाटण प्राचार्य चेतन सावंत, प्रा.भारत कांबळे, प्रा.अमोल चव्हाण, प्रा समीर संकपाळ यांचे सह कोयना एज्युकेशन सोसायटी पाटण संस्थेतील शिक्षक उपस्थित होते.

संजीव चव्हाण पुढे म्हणाले की, आज जग झपाट्याने बदलत आहे. नवीन तंत्रज्ञान, नवीन संधी आणि नवीन आव्हाने आपल्या समोर उभी आहेत. त्यामुळे जो नवनवीन कौशल्य आत्मसात करेल, तोच यशाच्या शिखरावर पोहोचेल. त्यामुळे ज्याच्याकडे कौशल्य आहे, त्याच्याकडे संधी आपोआप येतील.आजच्या युवकांनी केवळ नोकरी मागणारे न बनता, नोकरी देणारे बनण्याचा विचार केला पाहिजे. उद्योजकता, नवीन कल्पना, आणि कौशल्य यांच्या जोरावर आपण स्वतः च आणि देशाचं भविष्य घडवू शकतो. आजच्या युवकांनी केवळ नोकरी मागणारे न बनता, नोकरी देणारे बनण्याचा विचार केला पाहिजे. उद्योजकता, नवीन ल्पना, आणि कौशल्य यांच्या जोरावर आपण स्वतःच आणि देशाचं भविष्य घडवू शकतो. आपल्या प्रत्येकामध्ये एक वेगळे कौशल्य आहे. त्याला ताकद बनवा. असे शेवटी म्हणाले. कार्यशाळेचे प्रस्ताविक इंस्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट, पाटण प्राचार्य चेतन सावंत, यांनी केले तर आभार प्रा समीर संकपाळ मानले